आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
८ जून २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारताच्या दिशेने महिलांनी परिवर्तनकारी भूमिका बजावली असून गेल्या ११ वर्षांत महिलांच्या विकासावर रालोआ सरकारचं लक्ष केंद्रीत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आजपासून सात दिवस फ्रान्स, युरोपीय महासंघ आणि बेल्जियमच्या दौऱ्यावर

- काँग्रेस नेता राहुल गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेविषयी सार्वजनिक मंचावरुन बोलण्याऐवजी निवडणूक आयोगाशी थेट संवाद साधावा, असं केंद्रीय निवडणूक आयोगाचं आवाहन

**आणि**

- फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरी गटाच्या विजेतेपदासाठी आज स्पॅनिश खेळाडू कार्लोस अल्काराझ आणि इटलीच्या जेन्निक सिन्नर यांचा सामना रंगणार

**<><><><>**

विकसित भारताच्या दिशेने महिलांनी परिवर्तनकारी भूमिका बजावली असून गेल्या ११ वर्षांत महिलांच्या विकासावरच रालोआ सरकारचं लक्ष केंद्रित असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. महिलांनी गेल्या ११ वर्षांत विज्ञान, शिक्षण, क्रीडा, स्टार्टअप्स, सशस्त्र दलं यांसह सर्व क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून सर्वांना प्रेरणा दिल्याचं त्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने सुरू केलेल्या मुद्रा योजनेमुळे लाखो महिला उद्योजक बनू शकल्या आणि त्यांची स्वप्नं पूर्ण करू शकल्या, हेही त्यांनी आपल्या संदेशात अधोरेखित केलं. प्रधानमंत्री आवास योजनेद्वारे महिलांच्या सक्षमीकरणावर भर दिला गेला तसंच बेटी बचाओ, बेटी पढाओ सारख्या मोहिमांमुळे मुलींच्या सक्षमीकरणासाठी एक राष्ट्रीय चळवळ सुरू केल्याचंही त्यांनी म्हटलं. महिलांच्या नेतृत्वाखाली विकासाची व्याख्या तयार करताना स्वच्छ भारत अभियान, जनधन खाती, उज्ज्वला योजनेद्वारे अनेक स्वयंपाक घरांना धूरमुक्त करणारा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

<><><><>

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आज फ्रान्स, युरोपीय महासंघ आणि बेल्जियमच्या सात दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर रवाना होणार आहेत. या फ्रान्स दौऱ्यादरम्यान, पॅरिस आणि मार्सेली इथं ते भेट देणार असून फ्रान्सचे ‘युरोप आणि परराष्ट्र’विषयक मंत्री जीन नोएल बॅरोट यांच्याशी ते द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. फ्रान्सच्या वरिष्ठ नेतृत्वाशी ते विचार विनिमय करतील, तिथल्या मान्यवर विचारवंतांशी आणि प्रसारमाध्यमांबरोबरही ते संवाद साधतील. पहिल्या ‘भूमध्यसागरीय रायसीना संवादा’तही डॉ. जयशंकर सहभागी होणार आहेत.

<><><><>

भारताची दहशतवादाविरोधी भूमिका स्पष्ट करण्यासाठी सर्वपक्षीय प्रतिनिधिमंडळं जगातल्या विविध देशांना भेट देत आहेत. भाजपचे खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळानं काल बर्लिन इथं जर्मन सरकारच्या प्रतिनिधींची भेट घेतली. यावेळी त्यांनी भारताचं दहशतवादाविरोधातलं शून्य सहिष्णुता धोरण आणि सीमापार दहशतवादाचा सामना करण्याची रणनीती स्पष्ट केली. जर्मन सरकारच्या प्रतिनिधींनी दहशतवादाविरोधात आंतरराष्ट्रीय समुदायानं एकत्र येण्याची तातडीची गरज असल्याचं मत व्यक्त करत भारताच्या भूमिकेला पाठिंबा दर्शवला.

<><><><>

भारत आणि मंगोलिया यांच्यातला १७वा संयुक्त लष्करी सराव मंगोलियात उलानबातर इथल्या विशेष दल प्रशिक्षण केंद्रात सुरू आहे. संयुक्त राष्ट्रांच्या निर्देशानुसार निम-शहरी आणि डोंगराळ प्रदेशात अपारंपरिक पद्धतीने हा सराव करण्यावर भर दिला जात असून ३१ मे रोजी सुरू झालेला हा संयुक्त लष्करी सराव १३ जूनला संपणार आहे.

दोन्ही सैन्यांच्या युद्ध क्षमता वाढवणं, हे या सरावाचं उद्दिष्ट असल्याचं संरक्षण मंत्रालयानं जारी केलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे. दहशतवादी कारवायांविरोधी उपाययोजना करणं आणि अचूकपणे दहशतवाद्यांचे तळ टिपून अशा कारवाईमध्ये कार्यक्षमता वाढवण्याबरोबरच सध्याच्या काळातली सुरक्षा आव्हानं अधिक सक्षमतेनं पेलण्यावर या सरावात भर दिला जात आहे. या सरावात सहभागी सैन्यांमध्ये एकमेकांबाबत सांस्कृतिक सामंजस्य आणि सलोखा वाढवण्यावरही भर दिला जात आहे.

**<><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सार्वजनिक मंचावरून निवडणूक प्रक्रियेविषयी आरोप करण्याऐवजी निवडणूक आयोगाशी थेट संवाद साधावा असं आवाहन निवडणूक आयोगाने केलं असल्याचं अधिकृत सूत्रांनी सांगितलं. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला होता, त्यावर निवडणूक आयोगानं हे आवाहन केलं. गांधी यांनी आपली तक्रार लिखित स्वरूपात द्यावी, तसंच प्रत्यक्ष येऊन भेटावं असं आयोगानं म्हटलं आहे. निवडणूक आयोगाने काँग्रेसला १५ मे रोजी भेटीचं आमंत्रण दिलं होतं, मात्र त्यांनी ही भेट टाळली. गांधींचे आरोप इतके गंभीर आहेत मात्र ते तक्रार लिखित स्वरुपात देण्याचं टाळत आहेत, हे आश्चर्यजनक आहे, असं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><>**

परदेशातून भारतात शेअर्स, बाँड्स सारखी आर्थिक गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांनी.जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भारतीय शेअर बाजारातून ८ हजार ७४९ कोटी रुपये काढून घेतले. अमेरिका-चीन दरम्यान नव्यानं उभ्या राहिलेल्या व्यापार तणावाचं वातावरण आणि अमेरिकेतला रोख्यांवरचा वाढता व्याजदर हे यामागचं प्रमुख कारण मानलं जात आहे.ही घसरण याआधीच्या कलाच्या विरुध्द आहे, कारण मे महिन्यात या गुंतवणूकदारांनी सुमारे २० हजार कोटी रुपये आणि एप्रिलमध्ये ४ हजार कोटी रुपये निव्वळ गुंतवले होते, असं आकडेवारीतून स्पष्ट झालं आहे. शेअर बाजाराबरोबरच, परदेशी गुंतवणूकदारांनी २ ते ६ जून दरम्यान कर्ज बाजारातूनही पैसे काढून घेतले आहेत.

**<><><><>**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुषांच्या अंतिम फेरीत आज स्पॅनिश खेळाडू कार्लोस अल्काराझ आणि इटालियन खेळाडू जेन्निक सिन्नर यांचा सामना होईल. जेन्निक सिन्नर जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आहे तर अल्काराझ फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेचा गतविजेता आहे. सामना संध्याकाळी साडेसहा वाजता सुरु होईल.

उपांत्य फेरीत सिनरनं नोवाक जोकोविचचा सरळ सेटमध्ये पराभव केला तर अल्काराझविरुद्ध लोरेन्झो मुसेट्टीनं पायाच्या दुखापतीमुळं सामन्यातून माघार घेतली होती.

महिला एकेरीत, अमेरिकन टेनिसपटू कोको गॉफनं काल रात्री झालेल्या रोमांचक अंतिम सामन्यात अव्वल मानांकित अरिना सबालेंकाचा ६-७, ६-२, ६-४ असा पराभव केला. २०१८ च्या ऑस्ट्रेलियन खुल्या स्पर्धेनंतर जागतिक क्रमवारीतल्या अव्वल दोन महिला ग्रँड स्लॅम अंतिम फेरीत आमनेसामने आल्याची ही पहिलीच वेळ आहे. जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या गॉफचे हे दुसरं ग्रँड स्लॅम विजेतेपद आणि मातीच्या मैदानावरचा हा तिचा पहिला मोठा विजय आहे. या विजयानंतर कोको गॉफ फ्रेंच ओपन आणि अमेरिकन ओपन या दोन्ही स्पर्धांची एकेरी विजेतेपदं जिंकणारी सर्वात तरुण महिला खेळाडू ठरली आहे. २००२ मध्ये सेरेना विल्यम्सने ही कामगिरी केली होती.

**<><><><>**

नेदरलँडमध्ये अॅम्स्टेलव्हीन इथे झालेल्या FIH प्रो लीग सामन्यात भारताच्या पुरुष हॉकी संघाला नेदरलँडनं २-१ असं हरवलं. या चुरशीच्या लढतीत भारताचा कर्णधार हरमनप्रीत सिंग यानं आघाडी मिळवून दिली होती, मात्र नेदरलँडच्या थायस व्हॅन डॅमनं दोन गोल करत आपल्या संघाला विजय मिळवून दिला.

भारताचा पुरुष संघ पुन्हा एकदा नेदरलँड्सविरुद्ध उद्या सायंकाळी सहा वाजता सामना खेळणार आहे. येत्या बुधवारी त्यांचा सामना अर्जेंटिनाविरुद्ध होणार असून, तो सायंकाळी साडेसहा वाजता सुरू होईल.

भारताचा महिला संघ आपला पहिला सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध लंडनमधील ली व्हॅली हॉकी अॅण्ड टेनिस सेंटर इथे खेळणार आहे.

सध्या पुरुष विभागात भारताचा संघ चौथ्या क्रमांकावर असून, महिला संघ सहाव्या स्थानावर आहे.

FIH प्रो लीग २०२४-२५ चा युरोपिय टप्पा कालपासून पुन्हा सुरू झाला आहे. या वर्षीच्या स्पर्धेत पुरुष आणि महिला दोन्ही विभागांमध्ये ९ देश सहभागी झाले आहेत.

पुरुष विभागात, भारतासह अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, इंग्लंड, जर्मनी, आयर्लंड, नेदरलँड आणि स्पेन हे संघ सहभागी आहेत. तर महिला विभागात, भारतासह अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, बेल्जियम, चीन, इंग्लंड, जर्मनी, नेदरलँड आणि स्पेन हे संघ सहभागी आहेत.

सहा महिने चालणाऱ्या या हंगामातल्या या स्पर्धेचे विजेते थेट FIH हॉकी विश्वचषक २०२६ साठी पात्र ठरणार आहेत.

ऑस्ट्रेलियाचा पुरुष संघ आणि नेदरलँडचा महिला संघ, मागील आवृत्तीत विजय मिळवून आधीच विश्वचषकासाठी पात्र ठरले आहेत. नेदरलँडचा पुरुष संघ आणि बेल्जियमचे पुरुष तसच महिला संघ, यजमान म्हणून विश्वचषकासाठी पात्र आहेत.

**<><><><>**

अमेरिकेत लॉस एंजेलिस इथे उद्भवलेला तणाव नियंत्रणात आणण्यासाठी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या भागात २ हजार राष्ट्रीय सुरक्षा सैनिक तैनात करण्याचे आदेश दिले आहेत. स्थलांतर आणि सीमाशुल्क अंमलबजावणी विभागाने पुरेशी कागदपत्रं नसलेल्या स्थलांतरितांवर छापे टाकून ११८ जणांना अटक केली. या कारवाईविरोधात जाळपोळ झाल्यामुळे हा तणाव निर्माण झाला. लॉस एंजेलिस अधिक सुरक्षित करण्यासाठी हे छापे टाकल्याचं ट्रम्प प्रशासनातल्या अधिकाऱ्यांचा म्हणणं आहे.

**<><><><>**

सिक्किममधे भूस्खलनामुळे चातेन इथं अडकलेल्या स्थानिकांच्या मदतीसाठी राज्य सरकारनं विशेष हेलिकॉप्टरची व्यवस्था केली आहे. या भागात मुसळधार पाऊस आणि भूस्खलनामुळे रस्त्यांची वाताहत झाली असून अडकलेल्यांची सुटका करण्यासाठी हवाई मार्गाचा वापर केला जात आहे. पाक्योंगच्या गिरीनफील्ड विमानतळावरुन आज सकाळीच पहिलं हेलिकॉप्टर रवाना झालं असून मदतकार्य प्रगतीपथावर आहे.

**//<><><><>//**